# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 18 January 2026

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १८ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज सकाळी काझीरंगा एलीव्हेटेड कॅरीडोर प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. सुमारे सात हजार कोटी रुपये गुंतवणुक असलेल्या आणि राष्ट्रीय महामार्ग, एनएच-७१५ च्या कालियाबोर-नुमालीगढ विभागाचं चौपदरीकरण याद्वारे प्रस्तावित आहे.

८६ किलोमीटर लांबीच्या या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पात काझीरंगा राष्ट्रीय उद्यानातून जाणारा ३५ किलोमीटर लांबीचा उन्नत वन्यजीव कॉरिडॉर, २१ किलोमीटरचा बायपास आणि एनएच-७१५ च्या ३० किलोमीटर भागाचे दोन मार्गावरून चार मार्गांमध्ये रुंदीकरण यांचा यात समावेश आहे. या उपक्रमाचा उद्देश उद्यानाची अद्वितीय जैवविविधता जपताना प्रादेशिक जोडणी जाळे बळकट करणे हा आहे. भारतात प्रकृती आणि प्रगती एकसमान सोबतीनं वाढत आहेत असं पंतप्रधान मोदी यावेळी बोलतांना म्हणाले. आपल्या डबल इंजिन सरकारच्या कामामुळेच भारतीय जनता पक्षानं महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणूकीत स्पष्ट बहुमत मिळवल्याचा उल्लेखही मोदी यांनी यावेळी बोलतांना केला. यासोबतच पंतप्रधान आपल्या असाम आणि पश्चिम बंगाल दौऱ्याच्या आज दुसऱ्या दिवशी विविध उपक्रमांत सहभाग घेणार आहेत. ते कोलकाता इथं नव्या दोन अमृत भारत जलद रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

****

स्वित्झर्लंडमध्ये झ्युरिक इथं 'दावोस समिट-२०२६' या जागतिक आर्थिक परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल रात्री मुंबईहून रवाना झाले. मुख्यमंत्री महाराष्ट्राच्या शिष्टमंडळांचे नेतृत्व करतील. महाराष्ट्राची एक ट्रिलियन डॉलर इकोनॉमीकडे वाटचाल अधिक वेगवान करण्यासाठी अधिकाधिक परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात आणण्याचे प्रयत्न या माध्यमातून करण्यात येत आहेत. या परिषदेत अनेक केंद्रीय मंत्री,राज्यांचे मुख्य मंत्री – शंभराहून जास्त सी.ई.ओ.- मुख्य कार्यकारी अधिकारी देशाचं प्रतिनिधित्त्व करत आहेत. प्रामुख्यानं जागतिक अव्हानं हा मुद्दा परिषदेत केंद्रस्थानी असेल.

****

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मोहोळनजिक देवडी पाटीजवळ मध्यरात्री झालेल्या भीषण मोटर अपघातात पाच जण तर एक जण जखमी झाला. मध्यरात्री उशिरा- साधारण बारा वाजेनंतर पनवेलहुन अक्कलकोटला देवदर्शनासाठी जाणा-या मोटारच्या चालकाचा ताबा सुटून रस्त्याच्या कडेला ती झाडावर आदळल्यानं ही दुर्घटना झाली. मृतात तीन पुरुष-दोन महिलांचा समावेश असून अन्य एक महिला खमी झाली.

****

विमानसेवा पुरवणाऱ्या इंडिगो कंपनीला नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि नागरी विमान वाहतूक संचालनालयाने गेल्या महिन्यात रद्द झालेल्या विमानांच्या पार्श्वभूमीवर २० कोटी ४० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. या कंपनीला परिचालन सुधारण्यासंदर्भात, जबाबदारांविरुद्ध कारवाई करण्यासंदर्भातील निर्देश देण्यात आले आहेत. प्रामुख्याने गेल्या 03 ते 05 डिसेंबर दरम्यान या विमानसेवेची वाहतूक सेवा पूर्णपणे विस्कळित झाली होती. त्याचा लाखो प्रवाशांना फटका बसला होता. नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं या संदर्भात चौकशीसाठी चार सदस्यीय समिती स्थापन केली होती. या समितीच्या अहवालानुसार हा दंड ठोठावण्यात आला आहे.

****

भारत आणि न्यूझीलंडदरम्यान तिसरा आणि अखेरचा एकदिवसीय क्रिकेट सामना आज इंदूर इथं खेळला जाणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरुवात होईल. तीन सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ एक – एकनं बरोबरीत असल्यानं दोन्ही संघ हा सामना जिंकून मालिकेत विजय मिळवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं दिसणार आहे.

****

देशभरातील भाविक मौनी अर्थात पौष दर्श अमावस्येनिमित्त देशभरात ठिकठिकाणी नद्यांमध्ये पवित्र मानल्या जाणा-या स्नानासाठी गर्दी करत आहेत. उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथं त्रीवेणी संगमावर हजारो भाविकांनी मोठ्या संख्येनं माघ मेळ्यांतर्गत स्नानासाठी आजही गर्दी केल्याचं वृत्त आहे

****

येत्या २६ जानेवारी रोजी,देशाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी राजधानी नवी दिल्ली सज्ज झाली आहे. भारताच्या लष्करी सामर्थ्यासह सांस्कृतिक समृद्धीचं प्रदर्शन यात होईल. यंदा राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्यानं हा सोहळा ऐतिहासिक ठरणार आहे. संचलनात सहभागी तीस चित्ररथारत महाराष्ट्राचा चित्ररथ 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचं प्रतीक' या संकल्पनेतून राज्याची परंपरा आणि आर्थिक शक्तीचे दर्शन अवघ्या जगाला घडणार आहे. यातून 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाईल.

यंदाच्या सोहळ्यासाठी युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून असणार आहेत. सोहळ्याशी संबंधीत 'राष्ट्रपर्व' हे विशेष संकेतस्थळ –भ्रमणध्वनी ॲपही विकसित करण्यात आले असून, तिकीटधारकांसाठी दिल्ली मेट्रोचा प्रवास मोफत ठेवण्यात आला आहे. संचलनानंतर लाल किल्ल्यावर २६ ते ३१ जानेवारी या काळात 'भारत पर्व'चं आयोजनही करण्यात आलं असून त्यातही महाराष्ट्राच्या संस्कृतीचा प्रदर्शन होणार आहे.

****

गोंदिया जिल्ह्यात तिरोडा तालुक्यातल्या ग्रामस्थांमध्ये भीती पसरलेला नरभक्षक बिबट्या पकडण्यात वन विभागाला यश आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं. या बिबट्यानं मागे ४ वर्षांच्या मुलाला ठार मारलं. त्यानंतर,या घनदाट भागात अनेक गावांतील मुला–मुलींना शाळेत जाणं बंद करावं लागलं होतं.

****